**गुरुराज नं २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित**
**(गंधर्वनगरी)**
**३०/अ, ४अ, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८.**
नोंदणी क्रमांक : एच एस जी (टी सी) / १०१ / १९९२-९३ दिनांक ४ जून १९९२.
**जावक क्रमांक : MC/2024/10/AGM/Proceedings/06**
**दिनांक :** २५/१०/२०२४

# ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त (मसुदा)
**फक्त सभासदांसाठी**

**विषय : गुरुराज नं. ०२ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित (गंधर्व नगरी) दिनांक २९. ०९. २०२४ रोजी झालेल्या ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज.**

आपल्या उपरोक्त संस्थेच्या दिनांक २९. ०९. २०२४ रोजी संपन्न झालेल्या ३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मसुदा सोबत जोडत आहोत. या संदर्भात सभासद आपला अभिप्राय, हरकती, आक्षेप किंवा काही सूचना असतील, तर आपण लेखी स्वरुपात दिनांक ३०/११/२०२४ पर्यंत (लेखी स्वरूपात) सोसायटी ऑफिसच्या पत्र पेटीत टाकाव्यात किंवा ईमेल द्वारे कळवावे ही विनंती. (gururajno2.gandharva@gmail.com)

M. V. Shevde | V. H. Deshpande | Desai
**मृणाल शेवडे** | **वैभव देशपांडे** | **विक्रमसिंह देसाई**
सचिव | खजिनदार | अध्यक्ष
व्यवस्थापकीय समिती | व्यवस्थापकीय समिती | व्यवस्थापकीय समिती

Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit, Pune
Regn No. PNA/HSG/(TC)/ 101/92-93 Dt. 04/06/1992

# **३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त (मसुदा)**
*(फक्त सभासदांसाठी)*

दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ४.३० वाजता संस्थेच्या इमारतीच्या पार्किंगमध्ये संस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली. आवश्यक गणसंख्या पूर्ण झाल्याने सभेला सुरुवात करण्यात आली.

सभेस एकूण **६१ सभासद** (प्रत्यक्ष उपस्थित व सहयोगी सभासद धरून) उपस्थित होते.
सभेचे अध्यक्षस्थान श्री. **विक्रमसिंह देसाई** (अध्यक्ष) यांनी भूषविले. सचिव श्रीमती **मृणाल शेवडे** यांनी नोटीस वाचून दाखवली. त्यास सर्वांनी संमती दिली.

## **विषय क्रमांक १ : दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहणे**

अध्यक्षांनी सर्वप्रथम उपस्थित सभासदांचे स्वागत केले व संस्थेच्या दिवंगत सभासदांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनिटे मौन पाळण्यासाठी विनंती केली. मागील वर्षात निधन झालेले कै. श्री उपलप, कै श्री केशव ओक , कै श्री चिंतामणी पाठक, कै श्री गावस्कर यांच्या स्मृतीस सर्वांनी अभिवादन केले.

## **विषय क्रमांक २ : ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे**

सचिव श्रीमती मृणाल शेवडे यांनी १७ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या ३२ व्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखवले.

- काही सभासदांनी "Maintenance Delay Charges" बाबत हरकती नोंदवल्या.
- अध्यक्षांनी स्पष्ट केले की ३२ व्या सभेतच या विषयावर ठराव घेऊन निर्णय झालेले आहेत आणि त्याची नोंद Audit Report मध्येही केलेली आहे.
- सदस्य श्री. केंकरे यांनी विचारले की Pending Objections ची दखल घेतली आहे का? त्यावर अध्यक्षांनी सांगितले की लेखी स्वरूपातील हरकती Management Committee समोर ठेवल्या गेल्या आहेत आणि त्यानुसार आवश्यक सुधारणा केल्या आहेत.

**ठराव:**

"दिनांक १७/०९/२०२३ रोजी झालेल्या ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त याद्वारे मंजूर करण्यात येत आहे."

सूचक : श्री. विक्रमसिंह देसाई (अध्यक्ष)

अनुमोदक : श्रीमती मृणाल शेवडे (सचिव)

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

## विषय क्रमांक ३ : आर्थिक वर्ष २०२३–२४ चे जमा-खर्च पत्रक व ताळेबंद मंजूर करणे

खजिनदार श्री. वैभव देशपांडे यांनी आर्थिक वर्ष २०२३–२४ चे हिशोब सादर केले.

- मागील वर्षाच्या तुलनेत खर्च वाढीचे मुख्य कारणे म्हणजे Redevelopment Process व Legal Consultation Fees असल्याचे नमूद करण्यात आले.
- "Garden Maintenance" व "Security Services" खर्च अपेक्षेपेक्षा वाढले असल्याचे निदर्शनास आले.

सदस्यांच्या प्रश्नोत्तरात:

- काही सदस्यांनी विचारले की Redevelopment Consultant ला किती रक्कम देण्यात आली?
  → खजिनदारांनी सांगितले की Consultant Fee ₹१,८०,०००/- दिली असून ती AGM ने मंजूर केलेल्या खर्च मर्यादित आहे.

**ठराव:**

"संस्थेचा आर्थिक वर्ष २०२३–२४ चा जमा-खर्च पत्रक व ताळेबंद मंजूर करण्यात येत आहे."

सूचक : श्री. वैभव देशपांडे (खजिनदार)
अनुमोदक : श्रीमती मृणाल शेवडे (सचिव)

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

## विषय क्रमांक ३ (अ) : मा. लेखापरीक्षकांचानी दिलेल्या अहवालची नोंद घेणे

अध्यक्षांनी सांगितले की मा. श्री. एस. जी. कुगांवकर यांनी केलेल्या लेखापरीक्षण अहवालानुसार संस्थेला "A" ग्रेड प्राप्त झाली आहे.

- सदस्य श्री. मंदार गोठीवरेकर यांनी विचारले की Audit Report मध्ये "Suspense Account ₹१८,९००/-" बाबत काय कार्यवाही झाली? माजी सचिव श्री पुणेकर यांनी त्यावर कोणती हि कार्यवाही केलेली नसून ते पैसे श्री विक्रमसिंह देसाई यांच्या कडून का घेतले याचा खुलासा न केल्याने ती रक्कम सुस्पेन्स अकाउंट्स मध्ये दाखवलेली आहे असे अध्यक्षांनी नमूद केले.

- सिक्युरिटी तसेच कचरा व्यवस्थापना मधील खर्चात वाढ झालेली असून, कॉर्पोरेशनच्या नियमात बदल झाल्याने दंड वाचवण्यासाठी आपल्याला ही वाढ करावी लागली आहे तसेच एजन्सी अपॉइंट केल्यानंतर चांगला बदल दिसला असल्याकारणाने ह्या खर्चाला व्यवस्थापकीय समितीची मान्यता घेऊन दरवाढ करून देण्यात आल्याचे माननीय सचिव मृणाल शेवडे यांनी सर्वांच्या निदर्शनास आणून दिले.

**ठराव:**

"संस्थेचा आर्थिक वर्ष २०२३–२४ चा लेखापरीक्षण अहवाल नोंद घेण्यात येत आहे."

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

## विषय क्रमांक ४ : लेखा परीक्षण दोष दुरुस्ती अहवाल (O-Form) नोंद घेणे

खजिनदारांनी सांगितले की Auditor ने Audit Report मध्ये दाखवलेल्या सर्व मुद्द्यांवर कार्यवाही झाली आहे.

- सदस्य श्री. केंकरे यांनी विचारले की O-Form वेळेत पाठवला का?
  → सचिवांनी उत्तर दिले की O-Form Society Office कडून संबंधित खात्यास पाठवलेला आहे.

- ऑडिटमध्ये सभासदांच्या मेंबरशिप डॉक्युमेंट बाबत स्पष्टीकरण देताना अध्यक्षांनी सांगितले की, मागील कमिटी कार्यरत असताना काही सदस्यांना सभासदस्यत्व तसेच शेअर सर्टिफिकेट अपडेशन करून देताना योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही. हाच विषय मागील वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये देखील चर्चेस आला होता तेव्हा देखील श्री पुणेकर यांचे दस्तावेज पूर्ण नसल्याकारणाने हा शेरा आलेला आहे व आम्ही ते श्री पुणेकर यांना कळवून त्याची पूर्तता करण्यास विनंती केलेली आहे असे सांगितले.

- तसेच सिंकिंग फंड एफडी मार्किंग करणे, ही वर्षानुवर्ष चालू असलेली किंवा ऑडिटरकडून सुचवलेला एक एक मुद्दा आहे परंतु त्यावर मागील वर्षाप्रमाणेच आपण यावर्षी कोणतीही कारवाई न करता नवीन सोसायटी पुनर्विकासानंतर त्या त्या पद्धतीने एफडीज मार्किंग करण्यात येईल असे अध्यक्षांनी सुचवले.

**ठराव:**

"O-Form ची नोंद घेऊन संबंधित कार्यालयास पाठविण्यास मंजुरी देण्यात येत आहे."

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

## विषय क्रमांक ५ : २०२४–२५ या आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे

मागील लेखापरीक्षक मा. श्री. एस. जी. कुगांवकर यांना फक्त दोनच वर्ष झाल्याने आपण तिसरे वर्ष देखील त्यांची नियुक्ती करू शकतो व त्यांची नियुक्ती कायद्याप्रमाणे आपल्याला करता येते असे मत अध्यक्षांनी मांडले व अध्यक्षांनी सुचवले की मागील वर्षाप्रमाणेच मा. श्री. एस. जी. कुगांवकर यांची पुढील १ वर्षासाठी लेखापरीक्षक म्हणून नियुक्ती करावी.

**ठराव:**

"संस्थेच्या २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी मा. श्री. एस. जी. कुगांवकर यांची नियुक्ती करण्यात येत आहे."

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

### विषय क्रमांक ६ : फ्लॅट हस्तांतरण व नवीन सभासदत्व मंजुरी

सचिवांनी १५/०९/२०२३ ते २९/०९/२०२४ या कालावधीत व्यवस्थापन समितीने मंजूर केलेल्या हस्तांतरण प्रकरणांची माहिती सादर केली.

- Sales Deed, Release/Gift Deed, नवीन सभासदत्व प्रकरणे

1. J 22 मंदार कुलकर्णी
2. H 22 मृणाल शेवडे व मानसी शेवडे
3. F 33 ओमकार साठे
4. H 12 श्री शिवाजी पाटील
5. E 23 श्री वैभव देशपांडे
6. C 11 श्री ढमढेरे
7. D 33 श्री केंकरे
8. G 34 श्री कारंथ
9. K 12 श्री चिंचवले
10. E 14 सौ मीरा भट
11. B 22 श्री आगटे
12. D 22 श्री निखिल मराठे
13. C 14 श्री कानिटकर
14. A 12 ऋतूजा विजय देशपांडे
15. B 31 श्री वाळुंजकर
16. K 22 एक के मूर्ती
17. A 14 श्री निरंजन देसाई
18. A 11 सौ ज्योत्स्ना देसाई
19. L 21 श्री संजय जोशी
20. A 21 श्री चारुदत्त जोशी
21. G 23 सौ अनुराधा देशपांडे व सौ गाडगीळ
22. C 34 श्री शंतनु कट्टे
23. B 13 श्री विलास कुलकर्णी
24. G 33 श्री विनायक जोगळेकर
25. F 13 श्री अत्रे
26. C 21 श्री वाडेकर
27. A 34 श्री उपलप
28. A 23 श्री फणसळकर
29. B 24 अमृता साने
30. E 13 श्रीमती नेत्रा भालेराव
31. F 14 श्रीमती गोवंडे
32. F 31 श्रीमती महाडिक
33. E 32 श्री योगेश्वर खाडीलकर
34. C 22 श्री सुनित आपटे
35. G 21 सौ रेवती जोशी
36. G 31 श्री विद्याधर गावस्कर
37. J 31 श्री डवरे

सर्व सभासदांनी सर्वानुमते  संमती दर्शवली.

**ठराव:**

"वरील सर्व फ्लॅट हस्तांतरणे व नवीन सभासदत्वास अंतिम मंजुरी देण्यात येत आहे."

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

## विषय क्रमांक ७ : सभासदांकडून आलेल्या लेखी सूचना

अध्यक्षांनी सांगितले की २१/०९/२०२४ पर्यंत तीन लेखी सूचना प्राप्त झाल्या आहेत:

१. कचऱ्याचे व्यवस्थापन देखभाल खर्चात कपात करावी.
२. टाक्यांचे पाणी गळती दुरुस्त करावी. यावर आपण पुनर्विकासाला जात असल्याकारणाने पुन्हा एकदा परिस्थिती जाणून घेऊन व्यवस्थापकीय समितीने योग्य तो निर्णय घ्यावा व त्यासाठी श्री नागेश जोशी यांच्या मदतीने त्याची सध्या परिस्थिती बघून योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले
३. सिक्युरिटी गार्डच्या बदल्याबाबत निर्णय घ्यावा.

अध्यक्षांनी स्पष्टीकरण दिले की तिन्ही मुद्द्यांवर कार्यवाही सुरू असून संबंधित Contractor/Agency ला सूचना दिलेल्या आहेत.

## विषय क्रमांक ८ : H-31 श्री. सुनील चौधरी यांच्या थकबाकीबाबत चर्चा

अध्यक्षांनी सांगितले की श्री. चौधरी यांची थकबाकी मागील १० वर्षांहून अधिक काळ प्रलंबित आहे.

यावर अध्यक्षांनी आत्तापर्यंत त्यांना दिलेल्या दोन नोटीसांचा उल्लेख करत, पुनर्विकास प्रक्रियेमध्ये काही अडचणी येणार नाही याची काळजी घेऊन योग्य ती कारवाही करण्याचा आमचा प्रयत्न आहे असे सांगितले.

- काही सदस्यांनी विचारले की, "AGM/SGM मध्ये दरवेळी निर्णय होतो, पण प्रत्यक्ष Recovery होत नाही, असे का?"
  → अध्यक्षांनी स्पष्ट केले की या वेळेस अंतिम नोटीस देऊन DDR कडे प्रकरण सुपूर्द करण्याचा ठराव घेण्यात येईल.

**ठराव:**
"सभासद श्री. सुनील चौधरी (H-31) यांची थकबाकी वसुलीसाठी अंतिम नोटीस देऊन, न भरल्यास, कलम १५४ ब - २९ मधील तरतुदीनुसार वसुली अधिकाऱ्याची नेमणूक करून संपूर्ण वसुलीची प्रक्रिया पार पाडण्यात यावी यासाठी ही सभा व्यवस्थापन समितीस संपूर्ण अधिकार बहाल करून सदर प्रकरण  DDR कडे कायदेशीर कारवाईसाठी सुपूर्द करण्यास व पुढील प्रक्रिया करण्यास या ठरावा द्वारे मंजुरी देण्यात येत आहे"

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ९ : पुनर्विकास कामाचा आढावा**

अध्यक्षांनी पुनर्विकास प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली.

- मागील **Special General Body Meeting (SGM)** मध्ये Developer ने सादर केलेल्या **Plans, Draft Development Agreement** व **Power of Attorney Drafts** यांना सभासदांनी संमती दिलेली होती.
- या संमतीच्या आधारे Management Committee ने Legal Advisors बरोबर Drafts तपासले आहेत.
- आता Society पुढे जाऊन Agreement Signing प्रक्रियेस सुरुवात करणार आहे.

सभेत काही सभासदांनी विचारले:

- श्री. केंकरे यांनी विचारले की Agreement Sign करण्यापूर्वी Final Copy सर्व सभासदांना दाखवली जाईल का?
  → अध्यक्षांनी स्पष्ट केले की Final Copy WhatsApp Group व Society Office मध्ये पाठवली जाईल.

अध्यक्षांनी पुनर्विकासाच्या सद्यस्थितीबाबत सर्व सभासदांना सविस्तर माहिती दिली. त्यांनी नमूद केले की, संस्थेचे सदस्य व समिती सदस्य श्री. चिंचवले यांनी माहिती अधिकाराच्या माध्यमातून विविध कागदपत्रांची मागणी करून ती न मिळाल्याचा खोटा दावा केलेला आहे. प्रत्यक्षात ते बहुतेक सर्व व्यवस्थापकीय समितीच्या बैठकींना उपस्थित राहतात व त्यांना आवश्यक कागदपत्रे नियमितपणे प्राप्त होत असतात. तरीदेखील गैरसमज निर्माण करण्यासाठी अशा प्रकारच्या तक्रारी केल्या जात असल्याचे अध्यक्षांनी निदर्शनास आणून दिले. तसेच प्रत्येक कामावर विनाकारण आक्षेप घेण्याचा त्यांचा कल दिसून येत असल्याचेही नमूद केले.
संदर्भ : जा. क्र. पुणे शहर (१) / व्ही – ४ / शहा / गृह / सुनित / लोबो / पत्ता / २०२४ / ३४४८ दिनांक ६/८/२०२४ विषय – श्री कृष्णा चिंचवले यांनी केलेले तक्रार अर्ज व सोबत जोडलेले दस्ताऐवज तसेच उपनिबंधक कार्यालयातून त्यांना दिलेल्या उत्तर / पत्राची प्रत मिळणेबाबत

अध्यक्षांनी स्पष्ट केले की, अशा खोट्या आरोपांना उत्तरे देण्याचे बंधन पदाधिकारी व समिती सदस्यांवर नाही. तथापि, कोणत्याही सदस्यास अधिकृतरीत्या माहिती हवी असल्यास सोसायटीच्या कार्यालयात रीतसर अर्ज करून व नियमानुसार फी भरून कागदपत्रांची प्रत मिळू शकेल याची हमी दिली.

यानंतर अध्यक्षांनी कळविले की, श्री. भरत पंजाबी नावाच्या बाहेरील व्यक्तीने उपनिबंधक कार्यालयामध्ये आपल्या सोसायटीच्या पुनर्विकासासंबंधी कागदपत्रांची मागणी केली होती. सदर व्यक्तीचा सोसायटीशी कोणताही संबंध नसल्याने त्यांना कोणतेही कागदपत्र देण्यात येऊ नयेत असे अधिकृत उत्तर सोसायटीतर्फे देण्यात आलेले आहे. अशा प्रकारच्या बाहेरील मागण्यांमागे काही कटकारस्थान असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही अध्यक्षांनी स्पष्ट केले. यापूर्वी देखील अशा स्वरूपाचे खोटे आरोप सोसायटीमध्ये झालेले असल्याने, त्याकडे दुर्लक्ष करून आपण पुनर्विकासाच्या प्रक्रियेला गती देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

संदर्भ : जा. क्र. पुणे शहर (१) / व्ही – १ / शहा / गुरुराज नं. २ / गृह / माहिती अधिकार / २४ दिनांक १६/८/२०२४, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कल ११ (१) अंतर्गत नोटीस

अध्यक्षांनी पुढे सांगितले की, आपली प्रक्रिया योग्य मार्गावर आहे. काही प्रमाणात दिरंगाई झाली असली तरी आधी उचललेले कोणतेही पाऊल मागे घ्यावे लागलेले नाही. लवकरच डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट आणि पॉवर ऑफ ॲटर्नी साईनिंगची प्रक्रिया पूर्णत्वास जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**ठराव:**

"SGM मध्ये मंजूर झालेल्या Development Agreement व Power of Attorney Drafts वर आधारित, Society पदाधिकाऱ्यांनी पुढे जाऊन डेव्हलोपमेंट अग्रीमेंट (Development Agreement) नोंदणीकृत करण्यास व पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येत आहे."

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक १० : ऐनवेळी आलेले विषय**

१. दिवाळी भेट – Society Staff व Security Guards यांना प्रत्येकी ₹१०००/- देण्यास मंजुरी.

२. Housekeeping व Garbage Collection Contractors यांना योग्य त्या मोबदला देऊन पुनर्विकास होऊ पर्यंत सोसायटीचा कारभार चालवणे.

३. काही सदस्यांनी मागील तीन-चार महिन्यांतील घडामोडींबाबत व्हॉट्सॲप ग्रुपवर विचारणा केली. त्यास उत्तर देताना अध्यक्षांनी स्पष्ट केले की सध्या कामाचे वातावरण अनुकूल नसून, श्री. कृष्णा चिंचवले यांनी अध्यक्ष विक्रमसिंह देसाई, सचिव मृणाल शेवडे, खजिनदार वैभव देशपांडे आणि समिती सदस्य श्रीष पोंक्षे यांच्याविरुद्ध खोटी पोलीस तक्रार दाखल केली आहे. त्यात ॲट्रॉसिटीसारखे गंभीर पण बिनबुडाचे आरोपही करण्यात आलेले आहेत.

   या संदर्भातील पोलीस तपासणीदरम्यान आम्ही जबाबदारीने सर्व पुरावे, त्यात व्हिडिओ रेकॉर्डिंगसह, सादर केले आहेत. तथापि, ही कारवाई ही फक्त मानसिक छळ करून समिती सदस्यांचे मनोबल खच्चीकरण करण्याचा प्रयत्न असल्याचे अध्यक्षांनी निदर्शनास आणले. तसेच, राजकीय वर्तुळातील व्यक्ती असलेले श्री. पायगुडे यांच्या माध्यमातून पोलिसांवर दबाव आणण्याचेही प्रयत्न होत असल्याची माहिती दिली.

   यानंतर अध्यक्षांनी कळविले की श्री. भरत पंजाबी यांनी उपनिबंधक कार्यालयामार्फत आपल्या सोसायटीच्या पुनर्विकास प्रक्रियेतील दस्तावेजांची मागणी 'माहितीचा अधिकार' या कायद्याखाली केली आहे. या संदर्भात सोसायटीकडून योग्य ते उत्तर देण्यात आले असून, असे कोणतेही महत्त्वपूर्ण दस्तावेज बाहेर गैरवापरासाठी उपलब्ध होऊ नयेत, म्हणून ते सोसायटीच्या नोंदीतच ठेवण्यात येतील. तथापि, सभासदांना ते दाखविण्याची सुविधा दिली जाईल. जर कोणत्याही सभासदास प्रत आवश्यक असेल, तर कायद्यानुसार लागणारे शुल्क भरून अर्ज सादर केल्यावर पंधरा दिवसांच्या आत ती प्रत उपलब्ध करून देण्यात येईल.

   या चर्चेदरम्यान काही सदस्यांनी विनाकारण त्रास देणाऱ्या व्यक्तीचे सभासदत्व रद्द करता येईल का, असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर अध्यक्षांनी उत्तर दिले की सभासदत्व रद्द करण्यासाठी कायद्यानुसार ठराविक प्रक्रिया आहे. जर अशी वेळ आली, तर आपल्या सोसायटीत ती प्रक्रिया

राबविणे निश्चितच शक्य आहे.

**विषय क्रमांक ११ : आभार प्रदर्शन**

सचिव श्रीमती मृणाल शेवडे यांनी सर्व सभासद, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांचे आभार मानले.

त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष यांनी संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या वतीने सभेस उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले आणि सभा संपल्याचे जाहीर करून सभेची सांगता केली.

M.V. Shevde

**मृणाल शेवडे**
सचिव
व्यवस्थापकीय समिती

V. H. Deshpande

**वैभव देशपांडे**
खजिनदार
व्यवस्थापकीय समिती

Desai

**विक्रमसिंह देसाई**
अध्यक्ष
व्यवस्थापकीय समिती

Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit, Pune
Regn. No. PNA/HSG/(TC)/ 101/92-93 Dt. 04/06/1992